REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2025

# महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक गोपाळ हरी देशमुख आणि महादेव गोविंद रानडे यांचे सामाजिक कार्य

प्रा. प्रमोद कमलाकर नरखडे
इतिहास विभाग, दे.सं. गरड महाविद्यालय, मोहोळ. ता. मोहोळ, जि. सोलापूर.

## 1. प्रस्तावना -



19 व्या शतकातील महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास हा परिवर्तनाचा इतिहास आहे. हा काळ म्हणजे अंधश्रद्धेचा, रूढीपरंपरेचा होता. समाजात बालविवाह, बहुपत्नीत्व पद्धत रूढ होत्या. जातीभेद मानला जायचा, कर्मकांडाला अधिक महत्त्व दिले जायचे. समाजातील या प्रथा परंपराविरुद्ध विचारपूर्वक आवाज उठवणाऱ्या समाजसुधारकांमध्ये गोपाळ हरी देशमुख आणि न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

लोकहितवादी म्हणजे गोपाळ हरी देशमुख 'शतपत्रे' या लेखमालेतून महाराष्ट्रातील समाजसुधारणेला योग्य गती दिली. त्याचप्रमाणे महादेव गोविंद रानडे यांनी सामाजिक सुधारणेचा पाया घातला. त्याचबरोबर शैक्षणिक आणि सार्वजनिक क्षेत्रात भरू कार्य केले. त्यामुळे महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळी एक नवीन ऊर्जा प्राप्त झाली. म्हणून गोपाळ हरी देशमुख आणि महादेव गोविंद रानडे हे दोघेही द्रष्टे सुधारक होते. त्यांच्या या कार्याने नवशिक्षित समाज जागा होऊन प्रबोधनाच्या चळवळीत आला. अनेक सामाजिक संस्था उभा राहिल्या आणि याच कालखंडाला महाराष्ट्राचा प्रबोधनाचा कालखंड म्हणून ओळखले जाऊ लागले.

## संशोधनाची उद्दिष्टे -

महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक गोपाळ हरी देशमुख आणि न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या कार्याचा शोध निबंध तयार करण्यामागील उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

- लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी केलेल्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास करणे.

- एकूण सुधारणावादी चळवळीतील लोकहितवादीच्या कार्याचे महत्त्व स्पष्ट करणे.
- न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी केलेल्या समाज सुधारणांचा अभ्यास करणे.
- अनिष्ट रूढी, परंपरा, जातीभेद, विधवाविवाह याविषयी सुधारकांची भूमिका समजावून घेणे.
- लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख व न्यायमूर्ती गोविंद महादेव रानडे यांच्या कार्यातील साम्य भेद स्पष्ट करणे.
- या दोन्ही समाजसुधारकांच्या कार्याचा एकूण महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनावर झालेला परिणाम अभ्यासणे.

## 3. संशोधनाची कार्यपद्धती -

या शोधनिबंधासाठी महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासावरील ग्रंथ, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विश्वकोशिय माहिती, काही उपलब्ध ऑनलाइन संदर्भाचा आधार घेतला आहे. विषयाचे तुलनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीने विवेचन करण्यात आले आहे.

## 4. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख :जीवन आणि कार्य -

गोपाळ हरी देशमुख (1823-1892) हे महाष्ट्रातील सुरुवातीच्या काळातील एक प्रभावी समाजसुधारक होते. 'लोकहितवादी' या टोपण नावाने त्यांनी लेखन केले. 'प्रभाकर' या साप्ताहिकांमधून त्यांनी सामाजिक प्रश्नावर लेखन करण्यास सुरुवात केली. दोन वर्षात त्यांनी एकूण 108 लेख लिहिले. पुढे हेच लेख किंवा पत्रे 'लोकहितवादींची शतपत्रे' म्हणून ओळखली गेली.

### 4.1 लोकहितवादींनी शतपत्रातून केलेली जनजागृती -

सामाजिक कार्य करत असताना लोकहितवादींनी शतपत्रातून कर्मकांड, जातीभेद, सामाजिक विषमता आणि अनिष्ट रूढीवर परखड टीका केली. बुद्धीप्रामाण्यवादाचा स्वीकार करून लोकांना जागे करण्याचे काम त्यांनी केले. इ. स. 1848 ते 1850 या काळात प्रभाकर या मराठी वृत्तपत्रातून त्यांनी लेखन केले. एकूण 100 लेखांचा संग्रह असल्याने याला शतपत्रे असे नाव पडले. या शतपत्रातून समाजातील अंधश्रद्धा आणि चुकीच्या रूढीवर टीका करून स्त्री शिक्षणाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. त्याचप्रमाणे विधवा विवाहाचा पुरस्कार करून जातीभेदाला तीव्र विरोध केला. शिक्षणाचा आणि विज्ञानाचा प्रसार होण्यासाठी लेखन केले. सामाजिक नैतिक मूल्यांचे जपणूक होण्यासाठी पत्रातून आपले विचार मांडले.

त्यामुळे शतपत्रे ही महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरली. या लेखाच्या माध्यमातून त्यांनी समाजाला विचार करायला प्रवृत्त केले. आधुनिक विचार शिकवले. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील समाज सुधारणेच्या चळवळीला प्रेरणा मिळाली.

**4.2 लोकहितवादींनी केलेला स्त्री शिक्षणाचा पुरस्कार -**

लोकहितवादीच्या काळात स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते. स्त्री शिक्षण हे समाजाच्या प्रगतीसाठी कसे आवश्यक आहे, हे त्यांनी पटवून दिले. शतपत्रातून त्यांनी स्त्रियांच्या अज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या समस्या स्पष्ट केल्या. त्याप्रमाणे स्त्रियांना शिक्षण मिळाले तर त्या स्वावलंबी बनतील, विचारशील बनतील, याचा समाजाला फायदा होईल. बालविवाहाची समस्या, स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक यावरून त्यांनी जनजागृती केली. त्यांच्या या विचारामुळे महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या इतिहासाला चालना मिळाली.

**4.3 जातिभेद आणि कर्मकांडावर केलेले भाष्य -**

जातिभेदामुळे समाजात सामाजिक विषमता निर्माण होऊन धर्माच्या नावावर लोकांचे शोषण केले जाते. त्यामुळे लोकहितवादींनी अशा कर्मकांडावर कडाडून प्रहार केला. सर्व माणसांना समान वागणूक मिळावी, शिक्षणाचा अधिकार सर्वांना मिळाला, सर्वांनी मिळून जातीय रूढीचा त्याग करावा असा, आग्रह त्यांनी शतपत्रातून केला.

**4.4 शिक्षण आणि सार्वजनिक जीवन -**

समाजाची प्रगती करायची असेल तर शिक्षण आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षण व्यवस्था सर्वदूर पसरली पाहिजे. त्यांनी सार्वजनिक वाचनालय आणि ज्ञानप्रसार करणाऱ्या उपक्रमांना आपण प्रोत्साहन दिले पाहिजे, असा विचार ते मांडतात. समाजसुधारणा आणि ज्ञान प्सार याचा घनिष्ठ संबंध आहे, हे त्यांनी समाजाला पटवून दिले.

## 5. महादेव गोविंद रानडे जीवन आणि कार्य -

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे (1842 ते 1901) हे एक उदारमतवादी समाजसुधारक, न्यायाधीश आणि सामाजिक सुधारणेचे खंदे समर्थक होते. त्यांनी सामाजिक सुधारणेचा विचार चळवळीच्या माध्यमातून पुढे नेला.

**5.1 बालविवाहाला विरोध आणि विधवा विवाहाचा पुरस्कार -**

बालविवाह ही समाजातील गंभीर समस्या आहे हे त्यांनी जाणले होते. बालविवाह करू नयेत, विवाहासाठी योग्य वय, स्त्री शिक्षण आणि स्त्रियाला मिळणारा सन्मान यांचा त्यांनी पुरस्कार केला. बालविवाह कायमस्वरूपी बंद व्हावेत, यासाठी त्यांनी समाजसुधारणेच्या माध्यमातून जागृती केली. विधवांची अवस्था अतिशय बिकट होती. विधवांची स्थिती सुधारावी म्हणून त्यांनी इ. स. 1865 मध्ये विधवाविवाह उत्तेजक मंडळाच्या कार्याशी संबंध आला आणि तिथून पुढे त्यांनी विधवांना पुनर्विवाहाचा

अधिकार मिळावा आणि त्यांना सन्मानाने जगता यावे, यासाठी त्यांनी समाजसुधारणाच्या माध्यमातून प्रबोधन केले.

**5.2 स्त्री शिक्षण -**

रानडे यांच्या समाज सुधारण्याच्या कार्यात त्यांनी स्त्री शिक्षणाला विशेष महत्त्व दिले होते. त्यांनी काही समाजसुधारकांच्या माध्यमातून 'महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना करून पुण्यातील हुजूरपागा येथे मुलींची शाळा स्थापन केली.

**5.3 प्रार्थना समाजाचे कार्य -**

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे प्रार्थना समाजाच्या माध्यमातून अंधश्रद्धा, जातीभेद आणि सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी प्रयत्न केले. प्रार्थना समाजाच्या विचारांचा प्रसार करताना एकेश्वरवाद, नैतिकता व सामाजिक सुधारणा यांना त्यांनी महत्त्व दिले. प्रार्थना समाजाच्या माध्यमातून विधवा पुनर्विवाह व स्त्री शिक्षणाला चालना दिली. समाजात समानता स्थापन व्हावी म्हणून प्रयत्न केले. धार्मिक सुधारणांसाठी प्रयत्न केले. वाईट रुढी, परंपरा दूर करून जनजागृती करण्याचे काम केले. सामाजिक सुधारण्याचे जे प्रश्न होते ते प्रश्न त्यांनी चर्चेत आणले. यासाठी संघटित प्रयत्न केले. विवाह समारंभात जो अनावश्यक खर्च केला जातो, त्यावर भाष्य करून त्याची अनावश्यकता समाजाला पटवून दिली.

**5.4 सार्वजनिक सभा आणि आर्थिक विचार -**

रानडे केवळ समाजसुधारक नव्हते, भारताच्या आर्थिक विकासासाठी उद्योग, व्यापार आणि आधुनिक विचारांची गरज त्यांनी विशद केली. पुणे येथे सार्वजनिक सभेच्या कार्याला दिशा दिली. सार्वजनिक सभेच्या माध्यमातून त्यांनी जनतेच्या अनेक समस्या मांडल्या. यात शेतकरी, कामगार आणि सामान्य जनता यांचे प्रश्न होते. दुष्काळ, शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी सरकारच्या लक्षात आणून दिल्या. भारतीय समाजाच्या मनात त्यांच्या हक्काविषयी जाणीव निर्माण केल्या. अर्ज, निवेदनाच्या माध्यमातून या मागण्या त्यांनी सरकारपर्यंत पोहोचविल्या. लोकशिक्षण आणि सामाजिक सुधारणांना प्रोत्साहन दिले. त्याचप्रमाणे देशाच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाची गरज त्यांनी स्पष्ट केली.

## 6. गोपाळ हरी देशमुख व न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या कार्याची तुलनात्मक चिकित्सा -

गोपाळ हरी देशमुख व महादेव गोविंद रानडे यांचे दोघांचेही कार्य एकच आहे. समाजसुधारणा हे दोघांचेही ध्येय होते. दोघांनीही सामाजिक रूढीचे चिकित्सक परीक्षण केले. स्त्री शिक्षण, विधवा विवाह, जातीविरोध, बालविवाहाला विरोधी या विषयावर दोघांचेही काम सारखेच तोलामोलाचे आहे. दोघांकडेही

विवेकवादी दृष्टिकोन होता. लोकहितवादींनी लेखणीच्या माध्यमातून वैचारिक प्रबोधन केले. समाजातील दोषांवर परखड टीका केली. तर रानडे यांचे कार्यसंस्थात्मक होते. त्यांनी संघटनात्मक कार्यावर भर दिला. प्रार्थना समाज किंवा सार्वजनिक सभेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक परिवर्तनाला संघटित रूप देण्याचा प्रयत्न केला. लोकहितवादीकडे बुद्धीप्रामाण्यवाद होता. तर रानडे यांच्या कृतिशील सामाजिक आणि धार्मिक सुधारणेचे तत्व होते. म्हणून सामाजिक सुधारणा, शिक्षण, आर्थिक विकास, बालविवाह विरोध, विधवाविवाह उत्तेजन, रूढी परंपरांना विरोध, आधुनिक विचारांचा जागर ही दोन्ही विचारवंतांमधील समान तत्वे होती.

## 7. सामाजिक परिवर्तनातील योगदान -

आधुनिक समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने वरील दोन्ही सामाजिक सुधारकांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. लोकहितवादींनी समाजाला चिकित्सक दृष्टी दिली. तर रानडे यांनी सार्वजनिक चळवळीच्या माध्यमातून समाजसुधारणेला व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले. एकोणिसाव्या शतकात सुरू झालेली ही समाजसुधारणाची चळवळ तिची पायाभरणी करण्याचे काम या दोन्ही विचारवंतांनी केले आणि महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा पाया घातला. लोकहितवादींच्या शतपत्रातून सुरू झालेला हा समाजसुधारणेचा प्रवाह नंतर कित्येक वर्ष महाराष्ट्राला प्रेरणा देत राहिला. जवळजवळ एकाच कालखंडात या दोघांचेही कार्य आहे आणि तेही परस्परपूरक आहे.

## 8. निष्कर्ष -

गोपाळ हरी देशमुख आणि महादेव गोविंद रानडे हे महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील महत्त्वाचे विचारवंत आहेत. या शोध निबंधाच्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला त्यातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे :

- समाजसुधारणेसाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणामुळे अज्ञान अंधश्रद्धा दूर व्हायला मदत होईल. रूढी परंपरा कमी होईल, असा विश्वास दोन्ही विचारवंतांमध्ये होता.
- समाजसुधारणेसाठी स्त्रियांचे शिक्षण आवश्यक आहे. त्याचप्रमाणे बालविवाहाला विरोध व विधवा विवाहाला मान्यता याबाबतीत दोघांचीही विचारधारा एक आहे.
- जातीभेद व सामाजिक विषमता दूर केली पाहिजे आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार केला पाहिजे, याबाबतीत दोघांचीही एकमत आहे.
- समाजाने बुद्धीप्रामाण्यवाद स्वीकारावा, मानवतावादी दृष्टी ठेवावी, कालबाह्य रूढीचा त्याग करावा हे त्यांनी वारंवार अधोरेखित केलेले आहे.
- समाज प्रबोधनातून आधुनिक समाजाची निर्मिती होऊ शकते, यावर त्यांचा विश्वास होता आणि या भूमिकेतून त्यांनी वृत्तपत्रातून लेखन केले. सामाजिक संस्थांच्या माध्यमातून जनजागृती केली.

थोडक्यात लोकहितवादी आणि रानडे यांच्या कार्यामुळे सामाजिक जागृती निर्माण होऊन शिक्षण, स्त्री-पुरुष समानता, जाती निर्मूलन, विवेकवाद, सामाजिक न्याय या आधारावर आधुनिक समाजाची निर्मिती झाली. त्यामुळे महादेव गोविंद रानडे व गोपाळ हरी देशमुख या दोघांचेही कार्य अत्यंत मोलाचे आहे.

## संदर्भसूची


- डॉ. किशोरकुमार गव्हाणे, प्रा.डॉ. एस.पी.दे, प्रा.डॉ. जयश्री कुलकर्णी - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती 2014.
- महादेव गोविंद रानडे - महाराष्ट्र राज्य, मराठी विश्वकोश.
- गोपाळ हरी देशमुख - सामाजिक व वैचारिक कार्यावरील संदर्भ.
- Mahadeo Govind Ranade : A Bilography, T.V. Pravate, Asia Publishing House
- सरदेसाई बी.एन. - आधुनिक महाराष्ट्र.
- दीक्षित राजा - एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र
- मोरे दिनेश - आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास.
- गवळी पी.ए. - पेशवेकालीन महाराष्ट्र.
- राऊत गणेश व राऊत ज्योती - महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास.
- अत्रे, रायरीकर, केंजळे - महाराष्ट्र संस्कृती.
- भिडे, थोरात, पाटील - महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास.
- गायधनी, घोडके - आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास.
- गाठाळ एस.एस. - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास.
- गोवर्धन पारीख - लोकहितवादी
- फडके य. दि. - महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास
- देवळे शं. रा. - त्यागी समाजसुधारक
- ठोके मो. नि. - आधुनिक महाराष्ट्राचे उद्गाते